# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*


एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
**फोन नंबर ०७१३२–२१६५९२**


**क्र. गो.वि/आस्था/**2624**/२०१६** **दि. :** 28 **/१०/२०१६**

## परिपत्रक

विषय :– प्राचार्याच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात मुदतवाढी बाबत.
संदर्भ :– मा. सहसंचालक कार्यालय यांचे पत्र क्रमांक:उशिनाग/न्या.प्र/८१८०/१६, दि. १७/०९/२०१६.

गोंडवाना विद्यापीठातील संलग्नीत शारीरीक शिक्षण महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना/प्राचार्यांना त्यांच्या नियत वयोमान मर्यादामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. जुन्या तरतुदीनुसार प्राचार्यांना त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्याबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**सहपत्र :–**
१ वरीलप्रमाणे संलग्नीत संदर्भिय पत्र.

(डॉ. एस. एम. रोकडे)
कुलसचिव(का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
कार्यालय सहसंचालक,उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.
जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.
(दुरध्वनी क्र२५५४२१०/२५६१७१३ फॅक्स क्र०७१२-२५५४२१०)
Website.www.dirhe.org.in/jdnagpur Email-jdhengp @rediffmail.com

**अतितात्काळ/परिपत्रक**

क्र:- उशिनाग/न्या.प्र/२२५०/१६
दिनांक-१७/९/२०१६.

प्रति,

१. कुलसचिव, रा.तु.म.नागपूर विद्यापीठ नागपूर.
२. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
३. कुलसचिव, कवि कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ रामटेक.
४. प्राचार्य, नागपूर शारीरीक शिक्षण महाविद्यालय, धंतोली नागपूर.
५. प्राचार्य, ईश्वर देशमुख शारीरीक शिक्षण महाविद्यालय, नागपूर.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र.४६२१ दि.२१.९.१६
जावक क्र................दि............

**विषय :- प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात मुदतवाढ मिळणेबाबत....**

**संदर्भ :-** १. रिट याचिका क्र-५६२१/२०१२ डॉ अशोक बा. घोगरे –विरुध्द- महा.शासन व इतर मधील शासन पत्र क्र-न्यायाप्र२०१३/(५०१/१३)/विशि-२, दिनांक-२१ जोनवारी, २०१४.

२. रिट याचिका क्र-५७९८/२०१३ डॉ रमेशचंद कन्वर –विरुध्द- महा.शासन व इतर मधील शासन पत्र क्र-संकीर्ण२०१/प्र.क्र३४२/विशि-१, दिनांक-९ जुलै, २०१४.

३. रिट याचिका क्र-४९८/१३ श्री. यु.ए.ठाकुर –विरुध्द- महा.शासन व इतर मधील संचालनालयाचे पत्र क्र-उशिसं/२०१४/या.क्र४९८/२०१३/मवि-२/५५९६, दिनांक-२ जुलै, २०१४.

४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र-उशिनाग/न्याप्र/४०४६/१४,दि-१७.७.२०१४.

५. रिट याचिका क्र-४६३/२०१६ मधील मा.उच्च न्यायालयाचे आदेश दि-२२.४.२०१६.

६. संचालनालयाचे पत्र क्र-अमवि/२०१६/प्राचार्य/वयोमर्यादा वाढ/मवि-२/९३८२, दि-८.८.२०१६.

७. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन निर्णय क्र-शाशिम-२०११/(प्रक्र३३५/११)/क्रियुसे-२, दि-३१.१.२०१३.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधीन न्यायलयीन प्रकरणांमध्ये संबंधीत याचिकाकर्ता शारीरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांनी शासन निर्णय दिनांक-५ मार्च, २०११, २२ नोव्हेंबर २०११ व २३ फेब्रुवारी, २०१२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने सेवानिवृत्तीच्या नियतवयोमानामध्ये वाढ मिळण्याकरीता मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका दाखल करुन विनंती केलेली होती.

२. सदरहु याचिकांच्या अनुषंगाने शासनाचे संदर्भाधीन पत्र दिनांक-२१ जानेवारी, २०१४ व ९ जुलै, २०१४ मध्ये नमुद असलेले मुद्दे विचारात घेऊन, दिनांक-५ मार्च, २०११, २३ नोव्हेंबर २०११, २३ फेब्रुवारी २०१२ तसेच रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी शारीरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना/प्राचार्यांना लागू करता येणार नाही अशा निर्णय घेतलेला आहे.

तसेच या संदर्भात शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन निर्णय दिनांक-३१.१.२०१३ अन्वये सुध्दा निर्णय घेण्यात आलेला आहे.

३. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२०१५/प्रक्र४८४/१५/विशि-१,दि १२.७.२०१६ नुसार विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषि विद्यापीठे, तंत्र शास्त्र विद्यापीठातील प्राचार्यांच्या पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादा वाढ ६५ वर्षे करण्याबाबत अटींनुसार आदेश निर्गमित केले आहेत. सदरहु शासन निर्णय दि-१२.७.२०१६ मधील तरतुदी ह्या अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्यांना वरील संदर्भाधीन शासन पत्र दि-२१.१.२०१४, ९.७.२०१४ व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन निर्णय दिनांक-३१.१.२०१३ मधील कारणास्तव लागु करण्यात आलेले नाहीत.

त्यामुळे अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियत वयोमान मर्यादामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. सबब जुन्या तरतुदीनुसार प्राचार्यांना त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात यावे.

४. तसेच वरील संदर्भाधीन शासन पत्रांमधील निर्णयाच्या अनुषंगाने संचालनालयाचे संदर्भाधीन पत्र दिनांक २ जुलै, २०१४ व ८.८.२०१६ अनुसार शारीरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना/प्राचार्यांना सेवानिवृत्तीनंतर जर संस्थेने नियुक्ती पुढे चालू ठेवली असेल तर त्यांचे वेतन देण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील व सदरचे वेतन देण्याची जबाबदारी ही शासनाची राहणार नाही असे निर्देश दिलेले आहेत, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र -** वरील प्रमाणे.

A.M. Rahatgaonkar
**(डॉ.अंजली रहाटगांवकर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

**प्रत-** १. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. वेतन पथक/सेवानिवृत्ती/वेतन निश्चिती विभाग प्रस्तुत कार्यालय यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित.

f:\circular.doc